**अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (उदयान)**
**यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,**
**भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.**
**जा.क्र.माअधि/अपिल/ ५० /२०२३-२४**
**दि.०८/११/२०२३.**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (उदयान) मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

अखिल भारतीय कामगार कर्मचारी संघ, ................अपिलार्थी
शॉप नं.३, पद्मावती दर्शन, राम मंदिर रोड,
राम मंदिर समोर,
भाईंदर (प.) ४०१ १०१

मिरा भाईंदर महानगरपालिका
उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग
प्रभाग समिती क्र. ४, ५ व ६
आवक क्र. ६४ दि.१० ११/२०२३
२०२३८८४
उप. मुख्य उद्यान अधिक्षक

श्री.हंसराज मेश्राम ................प्रतिवाद
जनमाहिती अधिकारी तथा
उपमुख्य उदयान अधिक्षक,
उदयान विभाग.

**प्रस्तावना :-**

अखिल भारतीय कामगार कर्मचारी संघ यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा उपमुख्य उदयान अधिक्षक, उदयान विभाग यांचेकडे दि.०७/०८/२०२३ रोजी माहिती अधिकार अंतर्गत अर्ज सादर करून खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

१) मि.भा. मनपा अंतर्गत कार्यरत ठेकेदार मे. गुरूजी इन्फ्रास्ट्रक्चर यांनी उदयान व वृक्षप्राधिकरण विभागात कार्यरत असलेल्या ठेका मजूरांचा सन २०१६ ते सन २०२० पर्यंत वाढीव भत्ता (D.A) दिला असल्यास सविस्तर माहिती दयावी.
२) सदर ठेकेदारांनी सन २०१९ या वर्षाचा उदयान व वृक्षप्राधिकरण विभागात कार्यरत असलेल्या हे मजूरांचा सुट्टीचा पगार दिला असल्यास त्यांची सविस्तर माहिती मिळावी.
३) सदर ठेकेदारांनी उदयान वृक्ष प्राधिकरण विभागातील सन २०१४ ते सन २०२० पर्यंत ग्रॅच्युटी दिली असल्यास त्यांच्या नावाची यादी मिळावी.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत अर्ज केला असता जनमाहिती अधिकारी यांनी अपेक्षित वेळेत माहिती दिली नसल्याने अपिलार्थी अर्जदार यांनी दि.०५/१०/२०२३ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (उदयान) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी उपस्थित असून जनमाहिती अधिकारी तथा उपमुख्य उदयान अधिक्षक, उदयान विभाग हे प्रथम अपिलाच्या सुनावणीस अनुपस्थित आहेत.

**अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद:-**

माहिती अधिकार अंतर्गत अर्ज केला असता जनमाहिती अधिकारी यांनी अपेक्षित वेळेत माहिती दिली नसल्याने अपील केलेले आहे.

**जनमाहिती अधिकारी, तथा उपमुख्य उदयान अधीक्षक यांचा सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-**

जनमाहिती अधिकारी तथा उपमुख्य उदयान अधिक्षक, उदयान विभाग हे प्रथम अपिलाच्या सुनावणीस अनुपस्थित आहेत. परंतू जनमाहिती अधिकारी तथा उपमुख्य उदयान अधिक्षक, उदयान विभाग यांनी मे.गुरूजी इन्फ्रास्ट्रक्चर यांना जा.क्र.मनपा/उदयान/३०९/२०२३-२४ दि.२३/०८/२०२३ रोजीच्या पत्रान्वये माहिती त्वरीत उपलब्ध करून देणेबाबत पत्र देणेत आले असून सदर माहिती मे.गुरूजी इन्फ्रास्ट्रक्चर यांनी उपलब्ध करून दिली नाही.

**-: विवेचन :-**

जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत पूर्ण माहिती देणे बंधनकारक आहे. तसेच माहिती उपलब्ध करून देणेसाठी संबंधितास पत्र दिले असल्याचे अपिलार्थी यांना कळविणे आवश्यक होते. तथापि माहिती अधिकारी यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही हे खेदजनक आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: निर्णय :-**

1) जनमाहिती अधिकारी यांनी दिलेली नसल्याने अपिल मान्य करण्यात येत आहे.
2) जनमाहिती अधिकारी यांनी उपरोक्त तीनही मुदयांची माहिती १५ दिवसांच्या आत अपिलार्थी यांना विनामूल्य उपलब्ध करून दयावी.
3) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, 5 वा मजला, दालन क्र.528, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई 400614 यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(कल्पिता पिंपळे)
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपायुक्त (उदयान)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति :-**

1) अखिल भारतीय कामगार कर्मचारी संघ,
शॉप नं.३, पद्मावती दर्शन, राम मंदिर रोड,
राम मंदिर समोर, भाईंदर (प.) ४०१ १०१
2) उपमुख्य उदयान अधिक्षक, उदयान विभाग, प्रभाग समिती क्र.१,२,३
3) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (उदयान) यांचे कार्यालय.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

उद्यान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र.२८१०३४०९


जा.क्र. मनपा/उद्यान/मिरारोड/मा.अ./ ८२ /२०२३-२४

दिनांक :-२० /११/२०२३

माहितीचा अधिकार

प्रति,
मा.जन.माहिती अधिकारी तथा
उप.मुख्य उद्यान अधिक्षक
प्रभाग समिती क्र.१ ते ३
भाईंदर (प.)

विषय :- केंद्र शासन माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये मे.गुरुजी इंन्फ्रा यांनी उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागात कार्यरत असलेल्या ठेका मजुरांची माहिती मिळणे बाबत.

संदर्भ :- १) मे.अखिल भारतीय कामगार कर्मचारी संघ यांचा दि.०७/०८/२०२३ रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.
२) मा. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप. आयुक्त उद्यान यांचा दि.१०/११/२०२३ रोजीचा अपिलीय निर्णय

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की मे.अखिल भारतीय कामगार कर्मचारी संघ यांनी दि.०७/०८/२०२३ रोजीच्या माहिती अधिकार अर्जा अन्वये अपेक्षलेली माहिती हि आपल्या प्रभागाशी निगडीत असल्याने सदरची माहिती अर्जदारास परस्पर देणे करिता मा. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप. आयुक्त उद्यान यांनी दि.१०/११/२०२३ रोजीच्या अपिलीय निर्णयाद्वारे कळविलेले आहे.

तरी मे.अखिल भारतीय कामगार कर्मचारी संघ यांनी अपेक्षलेली माहिती त्वरीत देण्यात यावी.

(नागेश विरकर)
जन माहिती अधिकारी तथा
उप.मुख्य उद्यान अधिक्षक
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत माहितीस्तव:-
मे.अखिल भारतीय कामगार कर्मचारी संघ
शॉप नं ३,पद्मावती दर्शन, राम मंदीर समोर
भाईंदर (प.)

पोच
२१/११/२०२३
उद्यान विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

२१/११/२०२३